OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON
पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव
Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511
Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in

प्रेस नोट :- दिनांक -१९/११/२०२५

---

प्रति,

मा.संपादक,

दैनिक----------------

विषय :-स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी मुक्ताईनगर पोलीस स्टेशन हद्दीत मोठी कारवाई करुन २३ लाखाहुन अधिक किंमतीचा अंमली पदार्थ गांजा जप्त करुन आरोपीस अटक केले बाबत.

---ooo-----

दि.१९/११/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांना गोपनिय बातमीदाराकडुन मुक्ताईनगर पोलीस स्टेशन हद्दीतील मानेगांव येथे एका इसमाने आपल्या शेतात मोठ्या प्रमाणावर अंमली पदार्थ गांजाची लागवड केलेली असल्याची माहिती मिळाली.

सदर मिळालेल्या गोपनिय माहितीचे गांभीर्य लक्षात घेता मा. श्री डॉ महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव, मा.श्री संदीप गावित उपविभागीय पोलीस अधिकारी, प्रभार अपर पोलीस अधीक्षक, जळगांव परिमंडळ, व मा. श्री सुभाष ढवळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, मुक्ताईनगर उपविभाग, मुक्ताईनगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड यांना तात्काळ तपास पथक तयार करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या.

त्याअनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, यांनी स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव येथील अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करुन मुक्ताईनगर येथील मानेगाव येथे छापा टाकुन कारवाई करणे बाबत आदेशीत केले.

तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या गोपनिय माहितीप्रमाणे मुक्ताईनगर पो.स्टे. हद्दीतील मानेगाव येथे जावुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन छापा कारवाई करुन आरोपी नामे मनोज नामदेव घटे वय ४० वर्ष रा. मानेगाव ता. मुक्ताईनगर जि. जळगांव यास ताब्यात घेवुन त्याचे शेतातुन ५१ गांजाची झाडे वजन ३४१ किलो ५०० ग्रॅम (३ क्विंटल ४१ किलो ५०० ग्रॅम कि. अं. २३,२२,२००/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपी मनोज नामदेव घटे वय ४० वर्ष रा. मानेगाव ता. मुक्ताईनगर जि. जळगांव याचे विरुध्द मुक्ताईनगर पोलीस स्टेशन एन.डी.पी.एस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन गुन्ह्याचा पुढील तपास मुक्ताईनगर पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी ही मा. श्री डॉ महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, जळगांव ,मा. श्री संदीप गावित उपविभागीय पोलीस अधिकारी, प्रभार अपर पोलीस अधीक्षक, जळगांव परिमंडळ, व मा. श्री सुभाष ढवळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, मुक्ताईनगर उपविभाग, मुक्ताईनगर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड, तसेच पोउपनि. सोपान गोरे, पोहेकॉ/सुनिल दामोदरे, रफिक शेख, प्रेमचंद सपकाळे, विनोद पाटील, सलीम तडवी, श्रीकृष्ण देशमुख, पोकॉ/छगन तायडे, रतन गिते, मयुर निकम, रविंद्र चौधरी, चालक पोकॉ/भरत पाटील तसेच मुक्ताईनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक, श्री आशिष अडसुळ, सपोनि/जयेश पाटील, पोउपनि.निलेश गोसावी, पोहेकॉ/चंद्रकांत बोदडे, पोना/मोतीलाल बोरसे, पोकॉ/चेतन महाजन, रविंद्र धनगर, दिपक ठाकरे, गोविंद पवार, श्रावण भिल, जितेंद्र महाजन यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
जळगांव जिल्हा पोलीस


GPS Map Camera
Muktainagar,महाराष्ट्र,भारत
Tehsil Road, Muktainagar, Muktainagar, महाराष्ट्र 425306, भारत
Lat 21.040432, Long 76.058996
Wednesday, 19/11/2025 05:33 PM GMT+05:30
Note : Captured by GPS Map Camera